
# ५. सौर ऊर्जा

सौर ऊर्जा ही अक्षय स्रोत ऊर्जा आहे . ही सूर्यापासून मिळणारी ऊर्जा एक अफाट, अक्षय आणि स्वच्छ संसाधन आहे. ही ऊर्जा आपण थेट घरे आणि व्यवसायांना प्रकाश देण्यासाठी वापरू शकतो. त्याचप्रमाणे आपण ही ऊर्जा वीज, गरम पाणी ,स्वयंपाक आणि इतर विविध व्यावसायिक औद्योगिक वापरांचे उत्पादना करीता देखील होऊ शकतो अशा प्रकारे आपण सौर ऊर्जेचा वापर आपल्याला हवा तितका करू शकतो.

आमचे मार्गदर्शक चिंचणी तारापूर एज्युकेशन सोसायटी(C.T.E.S) चे अध्यक्ष मा. रजनीकांत भाई श्रॉफ मानवाच्या व समाजाच्या हितासाठी सूर्य शक्तीचा वापर अचूकपणे दर्शवितात,




सौर ऊर्जा जनजागृतीसाठी प्रभावी धोरणे स्वीकारून राबवितात. आमची C.T.E.S सोसायटी विद्यार्थ्यांना सौर उर्जेवर केंद्रित प्रकल्प व स्पर्धेत भाग घेऊन त्या जिंकण्यासाठी प्रोत्साहित करतात सौर ऊर्जेच्या फायद्याबद्दल लोकांना शिक्षित करण्यासाठी आमच्या सोसायटीने कार्यशाळा व चर्चासत्रांचे अनेकदा आयोजन केले आहे.

अध्यक्ष श्री रजनीकांत भाई श्रॉफ यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शाळा बाजार व कम्युनिटी सेंटर मध्ये बॅनर पोस्टर व

फ्लायर्स यासारख्या जनजागृती मोहिमांचे आयोजन केले आहे. आमचे C.T.E.S चे अध्यक्ष महाविद्यालयीन प्राध्यापक व शाळेतील शिक्षक ऑनलाइन प्लॅटफॉर्म वर्तमानपत्रांसाठी सौर ऊर्जेच्या पर्यावरणीय व आर्थिक फायद्याबद्दल ब्लॉग आणि लेख लिहितात. सोशल मीडिया मोहिमेसाठी आम्ही Facebook, Instagram आणि linkedin सारख्या प्लॅटफॉर्मवर सौर ऊर्जेबद्दल माहितीपूर्ण सामग्री व यशोगाथा पोस्ट करतो. आमची सोसायटी सौर ऊर्जा व पर्यावरण पूरक उत्पादने सादर करण्यासाठी सर महोत्सव करतो. असे सौर जत्रा, सोलार उत्पादनाचे प्रदर्शन ,सौर मेळावे अश्या अनेक प्रकारचे कार्यक्रम व मोहिमा आयोजित करतात. आमची सोसायटी ज्या सर्वात महत्त्वाच्या मोहिमेशी संबंधित आहे ती म्हणजे घरोघरी पत्रके वितरीत करतात व सोलार इन्स्टॉलेशन, सोलार लाईट, सोलार हिटर, सोलार कुकर इत्यादी बाबत मोफत सल्ला देऊन दैनंदिन जीवनात अशा साधनांचा वापर करण्यासाठी प्रवृत्त करतो.




आमचे अध्यक्ष मा श्री रजनीकांत भाई श्रॉफ यांची सौरऊर्जेच्या जनजागृतीकरणाकरिता भविष्यात काही नवीन योजना तयार केल्या आहेत. जसे की स्थानिक भागात सामुदायिक प्रतिबद्धता कार्यक्रम घेऊन त्यामध्ये

लहान सोलर इन्स्टॉलेशन (solar installation) ची कार्यक्षमता व त्याचा वापर दर्शवून सदर solar installation ची स्थापना करणार आहेत. तसेच सोलार अडॉपशनच्या जागृती कामी प्रभावी व्यक्ती कार्यकर्ता किंवा youtubers ची नियुक्ती करणार आहेत. आमचे अध्यक्ष ग्रामीण व शहरी भागात सौर ऊर्जेच्या जागृतीसाठी अक्षय उर्जेवर केंद्रित करणाऱ्या संस्थेसोबत सहकार्याने काम करण्याची देखील योजना आखली आहे. सोलार इन्स्टॉलेशन (solar installation) साठी सरकारी एजन्सी मार्फत सरकारी अनुदाने मिळवून देण्याकरता प्रयत्न करणे व खाजगी कंपन्यांसोबत हातमिळवणी करून परवडणाऱ्या सोलार किटचे वितरण करण्याचे योजिले आहे .तसेच जवळच्या भागातील यशस्वी सोलार अडॉपशनच्या केस स्टेडी करून वास्तविक उदाहरण देण्याची योजना संस्थेने आखली आहे. सार्वजनिक क्षेत्रात सौर उर्जेवर चालणारा पथदिवे किंवा पाण्याचे पंप लावून करणारे यासारखे पथदर्शी प्रकल्प राबविण्याचा मानस संस्थेचा आहे.

आमच्या संस्थेचे चेअरमन आदरणीय श्री रजनीकांत भाई श्रॉफ यांचा सौर ऊर्जेचा शंभर टक्के वापर पर्यावरणीय फायदे दीर्घ कालीन खर्च बचतीवरील मुख्य लक्ष ऊर्जा स्वतंत्र व विश्वासाहर्ते वर प्रकाश टाकणे विशेषतः दुर्मिळ भागात भविष्यातील ऊर्जा सुरक्षा व सरक्षेत्रात रोजगार निर्मितीवर भर देण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहू.

**प्रा. डॉ. चंद्रकेतू पामाळे**

एम. के. ज्युनिअर कॉलेज, चिंचणी